मराठी
# न्यूज एक्सप्रेस

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीरातीसाठी संपर्क साधा!

: 9834138482




# FDA Raid: 'वायसीएम' कँटीनवर FDAचा छापा!

## अन्नाच्या तक्रारींनंतर FDAची कारवाई; कँटीनच्या राजकीय कनेक्शनची चर्चा

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी येथील यशवंतराव चव्हाण स्मृती (वायसीएम) रुग्णालयातील कँटीनच्या कारभारावर अखेर अन्न व औषध प्रशासनाने (FDA) कारवाईचा बडगा उगारला आहे. अन्नपदार्थांचा दर्जा, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांच्या पालनाबाबत प्राप्त झालेल्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर FDAच्या पथकाने कँटीनवर अचानक छापा टाकून तपासणी केली. तपासणीदरम्यान काही त्रुटी आढळल्यानंतर भेसळीच्या संशयावरून चार खाद्यपदार्थांचे नमुने ताब्यात घेण्यात आले असून ते प्रयोगशाळा तपासणीसाठी पाठविण्यात आले आहेत. तसेच कँटीन चालकाला १४ दिवसांची कारणे दाखवा नोटीस बजावण्यात आली आहे. प्रयोगशाळेचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर त्यानुसार पुढील कायदेशीर कारवाई केली जाणार असल्याचे FDAकडून स्पष्ट करण्यात आले आहे.**



वायसीएम रुग्णालयात दररोज मोठ्या संख्येने रुग्ण तसेच त्यांचे नातेवाईक येत असतात. त्यामुळे रुग्णालयातील कँटीनमधील अन्नाची गुणवत्ता, स्वच्छता आणि अन्न सुरक्षा नियमांचे पालन हा अत्यंत संवेदनशील विषय आहे. कँटीनमधील अन्नपदार्थांच्या दर्जाबाबत तसेच स्वच्छतेबाबत तक्रारी प्राप्त झाल्यानंतर FDAच्या पथकाने ही कारवाई केली. तपासणीदरम्यान कँटीनमध्ये स्वच्छता आणि अन्न सुरक्षा मानकांच्या पालनाबाबत काही त्रुटी आढळल्याचे सांगण्यात येत आहे. त्यानंतर चार खाद्यपदार्थांचे नमुने घेण्यात आले. हे नमुने शासकीय प्रयोगशाळेत तपासणीसाठी पाठविण्यात आले असून, अहवालात अन्नपदार्थांच्या गुणवत्तेबाबत नेमके काय समोर येते, याकडे आता लक्ष लागले आहे.

FDAच्या छाप्यानंतर कँटीनच्या इतर सुविधांवरूनही प्रश्न उपस्थित झाले आहेत. कँटीनमध्ये ग्राहकांच्या टेबलवर पिण्यासाठी पाणी दिले जात नसल्याची तक्रार रुग्ण आणि त्यांच्या नातेवाइकांनी केली आहे. विकतचे पाणी घेण्यासाठीच टेबलवर पाणी दिले जात नसल्याचा आरोप ग्राहकांकडून करण्यात येत आहे. कँटीनमध्ये पाणी सांडल्यानंतर त्यावरून एक रुग्ण घसरून पडल्याची घटना घडली होती. त्यामुळे टेबलवर पाणी देणे टाळले जात असल्याचे कारण दिले जात असल्याची माहिती आहे. मात्र, रुग्णालयातील कँटीनमध्ये पिण्याच्या पाण्याची योग्य आणि सुरक्षित सुविधा उपलब्ध करून देण्याची जबाबदारी नेमकी कोणाची, हा प्रश्न या निमित्ताने उपस्थित झाला आहे.

कँटीन चालकाला कथित राजकीय पाठबळ असल्यामुळे तक्रारींकडे दुर्लक्ष झाले का, असा सवालही आता उपस्थित केला जात आहे. तक्रारी होत असताना FDAची कारवाई होण्यासाठी एवढा कालावधी का लागला? रुग्णालय प्रशासनाने यापूर्वी कँटीनची तपासणी केली होती का? कँटीन चालकावर यापूर्वी कोणती कारवाई करण्यात आली होती का? तसेच कँटीनचा ठेका देताना अन्न सुरक्षा, स्वच्छता आणि ग्राहकांच्या मूलभूत सुविधांबाबतच्या अटींची पूर्तता करण्यात आली होती का, असे अनेक प्रश्न या कारवाईनंतर पुढे आले आहेत.

### राजकीय 'वजन' असल्याने तक्रारींकडे दुर्लक्ष?

दरम्यान, संबंधित कँटीन चालकाचे शिवसेना शिंदे गटातील एका स्थानिक नेत्याशी निकटचे संबंध असल्याची चर्चा रुग्णालय परिसरात सुरू आहे. त्यामुळे FDAच्या कारवाईनंतर कँटीनच्या कथित राजकीय कनेक्शनचीही चर्चा रंगली आहे. मात्र, संबंधित राजकीय नेत्याशी कँटीन चालकाचे संबंध असल्याच्या चर्चेला अद्याप कोणताही अधिकृत दुजोरा मिळालेला नाही. त्यामुळे या दाव्यांची सत्यता स्वतंत्रपणे स्पष्ट होणे आवश्यक आहे.

# पिंपरी महापालिका सभेवर राष्ट्रवादीचा कायदेशीर बडगा; २ सप्टेंबरची सभा वादात!

» पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्वसाधारण सभेवरून राजकीय संघर्ष चांगलाच पेटला असून, २ सप्टेंबर रोजी होणारी सभा नियमबाह्य असल्याचा आक्षेप राष्ट्रवादी काँग्रेसने घेतला आहे. २० ऑगस्ट रोजी झालेली सर्वसाधारण सभा १७ सप्टेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली असताना, त्या सभेतील ३१ पैकी निवडक १८ विषय पुन्हा २ सप्टेंबरच्या स्वतंत्र सर्वसाधारण सभेत मंजुरीसाठी आणण्यात आल्याचा दावा राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष तथा नगरसेवक योगेश बहल यांनी केला आहे. या प्रकरणी बहल यांनी ॲड. असीम सरोदे यांच्या माध्यमातून महापौर रवी लांडगे, महापालिका आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी आणि नगरसचिव मुकेश कोळप यांना कायदेशीर नोटीस बजावली आहे.**



महापालिकेची २० ऑगस्ट रोजी सर्वसाधारण सभा झाली होती. मात्र, विषयपत्रिकेवरील विषयांवर चर्चा न करताच ही सभा १७ सप्टेंबरपर्यंत तहकूब करण्यात आली. त्यानंतर आता या तहकूब सभेतील निवडक १८ विषय २ सप्टेंबरच्या सभेत घेण्यात आले आहेत. याच प्रक्रियेला राष्ट्रवादी काँग्रेसने आक्षेप घेतला असून, तहकूब सभा ही मूळ सभेचाच पुढील भाग असते. त्यामुळे प्रलंबित विषयांची चर्चा आणि मंजुरी तहकूब सभेतच होणे आवश्यक असल्याचे नोटीसमध्ये नमूद करण्यात आले आहे.

नोटीसमध्ये महाराष्ट्र महापालिका अधिनियम तसेच अनुसूची 'डी'मधील तरतुदींचा दाखला देण्यात आला आहे. तहकूब सभेतील विषय स्वतंत्र सभेत आणण्याचा प्रशासनाचा उद्देश काय, असा सवालही करण्यात आला आहे. एकाच विषयाचा एकाच वेळी दोन वेगवेगळ्या सभांच्या विषयपत्रिकेत समावेश करता येत नाही, असा दावा राष्ट्रवादीकडून करण्यात आला आहे. २ सप्टेंबरच्या सभेत हे १८ विषय मंजूर झाल्यास १७ सप्टेंबरच्या तहकूब सभेच्या अधिकारालाच अर्थ उरणार नाही, असेही नोटीसमध्ये म्हटले आहे.

> "नगरसचिव कार्यालयाला नोटीस मिळाली आहे. त्यातील मुद्दे आणि तरतुदी नमूद केल्या आहेत. त्या वाचल्या आहेत. वरिष्ठांशी चर्चा घेऊन निर्णय घेण्यात येईल."
>
> -मुकेश कोळप, नगरसचिव, महापालिका

> "मला अद्याप नोटीस मिळाली नाही. सभा घेण्याचा अधिकार महापौरांचा आहे. त्यांना दिलेल्या नोटीसीची प्रत आयुक्त कार्यालयाला पाठवली असेल."
>
> -डॉ. विजय सूर्यवंशी, आयुक्त, महापालिका

> "महापौरांना महापालिकेची विशेष सर्वसाधारण सभा घेण्याचे अधिकार आहेत. मात्र, तहकूब सभेचे विषय सर्वसाधारण सभेत घेणे उचित नाही. त्याबद्दल कायदेशीर बाबी तपासूनच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षातर्फे नोटीस दिली आहे."
>
> -भाऊसाहेब भोईर, विरोधी पक्षनेता, महापालिका

> "बेकायदा कामकाज रोखण्याची जबाबदारी आयुक्त आणि नगरसचिवांची आहे. मात्र, त्यांच्याकडूनच चुकीच्या पद्धतीने होणाऱ्या कामकाजाला प्रोत्साहन दिले जात आहे. पहिल्या सर्वसाधारण सभेपासून सुरू झालेला त्यांचा गोंधळ अजून थांबत नाही."
>
> -योगेश बहल , शहराध्यक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस

# सागर बोकेफोडेंच्या ‘व्हिजन प्राईम रियल्टी’वर 7 हजार कुटुंबांचा विश्वास!

## कष्टातून ५०० एकरांची वाटचाल; प्लॉट खरेदीपूर्वी ‘या’ ५ बाबी तपासा!

>> पिंपरी | प्रतिनिधी

**अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत जिद्द, मेहनत आणि सचोटीच्या बळावर रिअल इस्टेट क्षेत्रात स्वतःची ओळख निर्माण करणारे उद्योजक सागर बोकेफोडे यांचा प्रवास नवउद्योजकांसाठी प्रेरणादायी ठरत आहे. लहान वयात वडिलांचे छत्र हरपल्यानंतर कुटुंबाची जबाबदारी खांद्यावर घेत त्यांनी कष्टाच्या जोरावर स्वतःचा व्यवसाय उभा केला. सुरुवातीला बांधकाम साहित्य व उपकरणे भाड्याने देण्याचा छोटा व्यवसाय सुरू केल्यानंतर त्यांनी रिअल इस्टेट क्षेत्रातील संधी ओळखून प्लॉटिंग व्यवसायात प्रवेश केला. आजवर तब्बल ५०० एकर जमिनीच्या खरेदी-विक्रीचा अनुभव त्यांच्या नावावर असून, ‘व्हिजन प्राईम रियल्टी’च्या माध्यमातून त्यांनी रिअल इस्टेट क्षेत्रात विश्वासार्हता निर्माण केली आहे.**



‘प्रत्येक सर्वसामान्याला सुरक्षित आणि उत्तम दर्जाची जागा किंवा हक्काचे घर मिळावे’, या उद्देशाने काम करणाऱ्या ‘व्हिजन प्राईम रियल्टी’वर आज ७ हजारांहून अधिक कुटुंबांनी विश्वास दाखवला असल्याचे सांगण्यात येते. ग्राहकांचा विश्वास हीच आपली खरी कमाई असल्याचे सागर बोकेफोडे मानतात. त्यामुळे केवळ जमीन विक्री करण्यापेक्षा ग्राहकांची आयुष्यभराची पुंजी सुरक्षित राहावी, यासाठी आवश्यक कायदेशीर बाबींबाबत जनजागृती करण्यावरही त्यांचा भर आहे.

जमीन किंवा प्लॉट खरेदी करताना ग्राहकांनी सर्वप्रथम ७/१२ उतारा आणि फेरफार नोंद तपासावी. जमिनीच्या मालकी हक्कासोबतच क्षेत्रफळ, बँकेचा बोजा किंवा कोणताही कायदेशीर वाद आहे का, याची खात्री करणे आवश्यक आहे. त्याचबरोबर निष्णात वकिलामार्फत टायटल सर्च आणि टायटल क्लिअरन्स रिपोर्ट तपासून जमीन ‘क्लिअर अँड मार्केटेबल’ आहे का, हे निश्चित करावे.

### शून्यातून उभारलं साम्राज्य!

शून्यातून सुरू झालेला सागर बोकेफोडे यांचा हा प्रवास केवळ व्यावसायिक यशाची कहाणी नसून, संकटांवर मात करून कष्ट आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर स्वतःचे विश्व उभारण्याची प्रेरणादायी गाथा आहे. ‘व्हिजन प्राईम रियल्टी’च्या माध्यमातून रिअल इस्टेट क्षेत्रात ग्राहकांचा विश्वास कायम ठेवण्याबरोबरच सुरक्षित जमीन खरेदीबाबत जनजागृती करण्याचा त्यांचा प्रयत्न महत्त्वाचा ठरत आहे.

याशिवाय संबंधित जमीन एन.ए. (NON-AGRICULTURAL) आहे का आणि तिच्या लेआउटला पीएमआरडीए किंवा नगररचना विभागाची आवश्यक मंजुरी आहे का, हे तपासणे महत्त्वाचे आहे. जमीन नेमक्या कोणत्या झोनमध्ये येते, यासाठी झोन सर्टिफिकेट तपासावे. निवासी किंवा व्यावसायिक वापरासाठी जमीन योग्य आहे का, तसेच भविष्यात कोणते नियोजनात्मक अडथळे येऊ शकतात का, याची माहिती घेणे आवश्यक आहे.

केवळ कागदपत्रे पाहून जमीन खरेदी न करता प्रत्यक्ष जागेची पाहणी आणि सरकारी मोजणी करून घेण्याचाही सल्ला सागर बोकेफोडे यांनी दिला आहे. प्रत्यक्ष जागेवरील हद्दी, सीमारेषा आणि कागदपत्रांमधील माहिती यामध्ये तफावत नाही ना, याची खात्री करणे गरजेचे आहे. त्यामुळे ग्राहकांनी कोणत्याही आकर्षक ऑफरला भुलण्यापूर्वी जमिनीची कागदपत्रे आणि कायदेशीर स्थिती तपासावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

# नगरसदस्यांच्या ‘ओळखी’ साठी ऐश्वर्या तरस मैदानात!



>> पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेतील सर्व नवनिर्वाचित नगरसदस्यांसाठी महापालिकेच्या वतीने अधिकृत आणि एकसमान स्वरूपाची ‘नगरसदस्य बॅच’ तयार करून उपलब्ध करून द्यावी, अशी मागणी शिवसेना नगरसेविका ऐश्वर्या राजेंद्र तरस यांनी महापौर रवि लांडगे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. महापालिका सभागृहासह विविध शासकीय, प्रशासकीय आणि सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये लोकप्रतिनिधी म्हणून नगरसदस्य सहभागी होत असल्याने त्यांची अधिकृत ओळख स्पष्ट आणि सुसंगत असणे आवश्यक असल्याचे त्यांनी निवेदनात म्हटले आहे.**

नुकत्याच झालेल्या महापालिका निवडणुकीत नागरिकांनी विविध प्रभागांतून आपल्या लोकप्रतिनिधींची निवड केली आहे. हे नगरसदस्य आता महापालिका सभागृहातील कामकाजासह विविध बैठका, पाहणी दौरे, शासकीय कार्यक्रम आणि सार्वजनिक उपक्रमांमध्ये नागरिकांचे प्रतिनिधित्व करत आहेत. त्यामुळे सर्व नगरसदस्यांना महापालिकेच्या वतीने समान स्वरूपाची अधिकृत बॅच देण्यात यावी, अशी मागणी करण्यात आली आहे

या बॅचवर पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे अधिकृत चिन्ह, ‘पिंपरी-चिंचवड महानगरपालिका’ आणि ‘नगरसदस्य’ असा स्पष्ट उल्लेख असावा, अशी सूचना निवेदनातून करण्यात आली आहे. विशेष म्हणजे, कोणत्याही पक्षभेदाशिवाय सर्व नगरसदस्यांना एकसमान स्वरूपाची बॅच उपलब्ध करून द्यावी, अशी भूमिका ऐश्वर्या तरस यांनी मांडली आहे.

अधिकृत बॅच उपलब्ध झाल्यास महापालिकेचे अधिकृत कार्यक्रम, विविध बैठका, पाहणी दौरे तसेच सार्वजनिक कार्यक्रमांमध्ये नगरसदस्यांची ओळख सहज होण्यास मदत होईल. त्याचबरोबर महापालिकेच्या लोकप्रतिनिधी व्यवस्थेला स्वतंत्र, सन्मानजनक आणि गौरवपूर्ण ओळख मिळेल, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. महापौर रवि लांडगे यांच्या मार्गदर्शनाखाली संबंधित अधिकारी आणि विभागांशी समन्वय साधून या बॅचची रचना निश्चित करावी आणि मागणीवर सकारात्मक निर्णय घेऊन आवश्यक प्रशासकीय कार्यवाही करावी, अशी विनंती ऐश्वर्या तरस यांनी केली आहे.




# पिंपरीत ७५वा भटके-विमुक्त दिवस उत्साहात;एकजुटीचा निर्धार

>> पिंपरी | प्रतिनिधी

**पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या वतीने भाटनगर, पिंपरी येथे ७५वा भटके-विमुक्त दिवस विविध उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. रक्तदान व आरोग्य तपासणी शिबिर, परिसंवाद, ढोल-ताशा आणि प्रबोधनात्मक सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.**

ब्रिटिश राजवटीत १८७१ पासून भटक्या-विमुक्त समाजाला ‘गुन्हेगार जमात’ म्हणून तारेच्या कुंपणात बंदिस्त करण्यात आले होते. स्वातंत्र्यानंतर ३१ ऑगस्ट १९५२ रोजी या समाजाला या जोखडातून मुक्त करण्यात आले. या संघर्षमय इतिहासाचे स्मरण करत समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षण, संघटन आणि स्वावलंबनाचा मार्ग स्वीकारण्याचे आवाहन कार्यक्रमातून करण्यात आले.

या कार्यक्रमाला बंदिस्त तारेच्या कुंपणात जन्म झालेले १०३ वर्षीय समर्थ सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज सोलापूरकर यांची विशेष उपस्थिती होती. त्यांच्या समाजसेवा, अध्यात्म आणि मानवकल्याणातील योगदानाबद्दल महापालिकेच्या वतीने मानपत्र देऊन गौरव करण्यात आला.

परिसंवादात भटके-विमुक्त समाजाची सामाजिक, शैक्षणिक आणि आर्थिक परिस्थिती तसेच विकासाची दिशा यावर चर्चा झाली. “शिक्षण, उद्योग आणि स्वावलंबनातूनच समाजाची प्रगती शक्य आहे,” असे प्रतिपादन सद्गुरू शिवलाल स्वामी महाराज यांनी केले. तर विशेष अधिकारी किरण गायकवाड यांनी “शिक्षण, संघटन आणि एकजूट हीच समाजाची ताकद आहे,” असे सांगितले.

‘भटके-विमुक्त लोकसंस्कृतीचा जागर’ या सांस्कृतिक कार्यक्रमातून समाजाच्या कला, संस्कृती आणि परंपरांचे दर्शन घडले. मोरया ढोल-ताशा पथकाच्या सादरीकरणाने कार्यक्रमात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. आरोग्य उपक्रमांतर्गत ३१ नागरिकांनी रक्तदान, तर २१० नागरिकांनी वैद्यकीय तपासणीचा लाभ घेतला.

महापौर रवि लांडगे, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांच्या मार्गदर्शनाखाली आणि अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे यांच्या अधिपत्याखाली झालेल्या कार्यक्रमास महापालिका अधिकारी, नगरसदस्य, सामाजिक कार्यकर्ते आणि भटके-विमुक्त समाजातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# चिंचवडची 9 वर्षीय अन्वी हिंगे बुद्धिबळाच्या जागतिक पटावर!

## WCM किताबासह FIDE U-9 क्रमवारीत अव्वल; स्वप्न उराशी बाळगून अन्वीची दमदार वाटचाल

**पिंपरी | प्रतिनिधी**

**अवघे नऊ वर्षांचे वय आणि बुद्धिबळाच्या पटावर आंतरराष्ट्रीय स्तरावरील दमदार कामगिरी! चिंचवड येथील युवा बुद्धिबळपटू अन्वी दिपक हिंगे हिने आपल्या बुद्धिमत्ता, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर राष्ट्रीय तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावर उल्लेखनीय यश मिळवून पिंपरी-चिंचवडसह महाराष्ट्र आणि देशाचे नाव उज्ज्वल केले आहे. अन्वीने WOMAN CANDIDATE MASTER (WCM) हा प्रतिष्ठेचा किताब मिळवला असून FIDE GIRLS UNDER-9 रेटिंगमध्ये जागतिक क्रमवारीत प्रथम स्थान पटकावण्याचा बहुमानही तिने मिळवला आहे.**



> "आज महापौर कार्यालयात अन्वीच्या आजवरच्या यशाबद्दल अभिनंदन करण्यात आले तसेच आगामी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या. "अवघ्या नऊ वर्षांच्या वयात अन्वीने आपल्या बुद्धिमत्ता, मेहनत आणि आत्मविश्वासाच्या जोरावर जागतिक स्तरावर पिंपरी-चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. आपल्या शहरातील अशा गुणवंत खेळाडूंचे यश हे संपूर्ण शहरासाठी अभिमानाची बाब आहे. आज अन्वीच्या हातात बुद्धिबळाचे मोहरे असले, तरी तिच्या डोळ्यांत भारतासाठी विश्वविजेतेपद मिळवण्याचे स्वप्न आहे. तिची ही जिद्द शहरातील हजारो मुला-मुलींना मोठी स्वप्ने पाहण्याची प्रेरणा देईल. अन्वीने भविष्यात जागतिक बुद्धिबळाच्या पटावर विक्रम नोंदवून भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवावा."
>
> -रवि लांडगे, **महापौर महापालिका**

WORLD CADET & YOUTH RAPID CHESS CHAMPIONSHIP (GIRLS U-8) स्पर्धेत उपविजेतेपद मिळवत अन्वीने जागतिक स्तरावर आपल्या खेळाची छाप उमटवली. अवघ्या नऊ वर्षांच्या वयात तिने भारतासाठी १३ आंतरराष्ट्रीय पदके जिंकली आहेत. ग्रीस, ताजिकिस्तान, मलेशिया आणि थायलंडसह विविध देशांमध्ये झालेल्या आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करत तिने उल्लेखनीय कामगिरी केली आहे.

नुकत्याच छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य U-9 मुलींच्या अजिंक्यपद स्पर्धेत २०२६ मध्ये अन्वीने विजेतेपद पटकावले. यापूर्वी महाराष्ट्र राज्य U-7 मुलींच्या गटातही ती विजेती ठरली असून राष्ट्रीय स्तरावरही तिने अनेक पदके मिळवली आहेत. तिच्या या सातत्यपूर्ण कामगिरीची राज्यस्तरावर दखल घेण्यात आली असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते तिचा गौरव करण्यात आला आहे.

अन्वी सध्या ELPRO INTERNATIONAL SCHOOL, CHINCHWAD येथे शिक्षण घेत आहे. अभ्यासासोबत बुद्धिबळाचा समतोल साधत ती ग्रँडमास्टर प्रवीण ठिपसे आणि फिडे मास्टर सिद्धांत गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली नियमित प्रशिक्षण घेत आहे. भविष्यात भारताचे प्रतिनिधित्व करत जागतिक बुद्धिबळाच्या पटावर सर्वोच्च स्थान मिळवून विश्वविजेतेपद पटकावण्याचे तिचे ध्येय आहे.

अन्वीच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महापौर कार्यालयात तिचे अभिनंदन करण्यात आले. आगामी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांसाठी तिला शुभेच्छा देण्यात आल्या. यावेळी अन्वीचे आई-वडील आरती दिपक हिंगे, दिपक जगन्नाथ हिंगे तसेच सामाजिक कार्यकर्त्या शलाका कोंडावार उपस्थित होत्या.

# महापालिकेतील ३८ कर्मचाऱ्यांचा सन्मानपूर्वक निरोप!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे योगदान देणाऱ्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना सन्मानपूर्वक निरोप देण्यात आला. ऑगस्ट २०२६ अखेर नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेले २८ आणि स्वेच्छानिवृत्ती घेतलेले १० अशा एकूण ३८ अधिकारी-कर्मचाऱ्यांचा सत्कार व निरोप समारंभ आचार्य अत्रे रंगमंदिर, संत तुकाराम नगर येथे पार पडला.**

यावेळी उपआयुक्त संदीप खोत यांच्या हस्ते सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले. "महापालिकेच्या सेवेत अनेक वर्षे प्रामाणिकपणे दिलेले योगदान निश्चितच प्रेरणादायी आहे. त्यांच्या कार्याची आठवण महापालिकेस सदैव राहील. सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य आनंदी, निरोगी आणि समाधानाचे जावो," अशा शुभेच्छा खोत यांनी दिल्या.

नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झालेल्यांमध्ये कार्यकारी अभियंता राजेंद्र शिंदे, उपअभियंता सुरेखा कुलकर्णी, लघुलेखक विजयश्री देसाई, मुख्याध्यापिका सविता पवार, कार्यालय अधीक्षक संजय गरगरे, लेखापाल सुचेता कुलकर्णी, मुख्य आरोग्य निरीक्षक सुनील वाटाडे, सिस्टर इनचार्ज निशिगंधा अमोलिक, क्रीडा शिक्षक शिवाजी मुटकुळे यांच्यासह विविध विभागांतील अधिकारी-कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

तर स्वेच्छानिवृत्ती घेतलेल्या कर्मचाऱ्यांमध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी डॉ. रविंद्र मंडपे, उपअभियंता सत्वशील शितोळे, दूरध्वनी चालक राजश्री गायकवाड, प्लंबर रोहिदास जमदाडे, मजूर संजू साळवे, स्प्रे-कुली दत्तात्रय ढगे, सफाई कामगार सुभाष गायकवाड यांच्यासह अन्य कर्मचाऱ्यांचा समावेश आहे.

कार्यक्रमास मुख्य कामगार कल्याण अधिकारी प्रमोद जगताप, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनसंपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक, कर्मचारी महासंघाच्या उपाध्यक्षा सुप्रिया सुरगुडे, महादेव बोत्रे, विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी महासंघाचे प्रतिनिधी तसेच सेवानिवृत्त अधिकारी-कर्मचाऱ्यांचे कुटुंबीय उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रमोद जगताप यांनी केले. सूत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी, तर आभार मुख्य लिपिक माया वाकडे यांनी मानले.






# खासदार सुप्रिया सुळे यांनी घेतली कलाटे कुटुंबीयांची भेट!

**पिंपरी | प्रतिनिधी**

**शिल्पा गवारे आत्महत्या प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) पक्षाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी कलाटे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले. यावेळी त्यांनी कुटुंबीयांशी सविस्तर चर्चा करून संपूर्ण घटनेची माहिती जाणून घेतली.**

या भेटीदरम्यान सुप्रिया सुळे यांनी कुटुंबीयांना धीर देत या प्रकरणात न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक ती सर्व मदत करण्याचे आश्वासन दिले. तसेच प्रकरणाची सखोल आणि निष्पक्ष चौकशी होऊन सत्य समोर येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले. संबंधित यंत्रणांनी प्रकरण गांभीर्याने घेऊन दोषींवर योग्य ती कारवाई करावी, अशी अपेक्षाही त्यांनी व्यक्त केली.

दरम्यान, कलाटे कुटुंबीयांनी खासदार सुळे यांच्यासमोर आपल्या भावना आणि मागण्या मांडल्या. या प्रकरणातील दोषींवर कठोर कारवाई करावी आणि कुटुंबाला न्याय मिळवून द्यावा, अशी मागणी त्यांनी केली. खासदार सुळे यांनी कुटुंबीयांच्या भावना समजून घेत त्यांना आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

# ससून रुग्णालयात ICU बेडचा ताण; दररोज 5 ते 6 गंभीर रुग्ण!

## अत्यवस्थ रुग्णांनो, आधी ICU बेड तपासा; ६० अतिरिक्त खाटांचा प्रस्ताव

**» पुणे | प्रतिनिधी**

**राज्यभरातील गरीब आणि सर्वसामान्य रुग्णांसाठी आधारवड ठरलेल्या बी. जे. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय आणि ससून सर्वोपचार रुग्णालयातील अतिदक्षता विभागावर रुग्णसंख्येचा मोठा ताण निर्माण झाला आहे. रुग्णालयातील ICUच्या खाटा बहुतांश वेळा पूर्ण क्षमतेने भरलेल्या असतात. त्यामुळे दररोज सरासरी ५ ते ६ गंभीर रुग्णांना ICU बेडसाठी प्रतीक्षा करावी लागत आहे. या पार्श्वभूमीवर अत्यवस्थ रुग्णाला ससूनमध्ये आणण्यापूर्वी बेडची उपलब्धता तपासून नोंदणी करावी, असे आवाहन रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी केले आहे.**




ससून हे वैद्यकीय शिक्षण व संशोधन विभागांतर्गत टर्शरी केअर सेंटर असल्याने येथे पुण्यासह संपूर्ण पश्चिम महाराष्ट्रातून गंभीर आणि अत्यवस्थ रुग्ण मोठ्या प्रमाणात उपचारासाठी दाखल होत असतात. रुग्णालयाच्या बाह्यरुग्ण विभागात दररोज सरासरी १ हजार ६२९ रुग्ण, तर आंतररुग्ण विभागात सुमारे १ हजार ३६ रुग्ण उपचार घेतात. वाढत्या रुग्णसंख्येमुळे उपलब्ध वैद्यकीय सुविधा, डॉक्टर, परिचारिका आणि विशेषतः अतिदक्षता विभागातील खाटांवर मोठा ताण निर्माण झाला आहे. ICUच्या खाटा अनेकदा पूर्ण क्षमतेने भरलेल्या असल्याने गंभीर रुग्णांना खाट मिळण्यासाठी प्रतीक्षा करावी लागत आहे.

ICUमधील एखादी खाट रिकामी झाल्यानंतर संबंधित विभागाच्या प्रभारी परिचारिकेकडील प्रतीक्षा यादीचा क्रम लक्षात घेऊन पुढील पात्र रुग्णाला ती खाट उपलब्ध करून दिली जाते. त्यामुळे अचानक गंभीर रुग्ण घेऊन रुग्णालयात आल्यानंतर तातडीने ICU बेड उपलब्ध होईलच, याची हमी देता येत नाही. पुणे आणि पिंपरी-चिंचवडमधील काही रुग्णालयांकडून अत्यवस्थ रुग्णांना शेवटच्या क्षणी ससून रुग्णालयात हलविले जाते. त्याचबरोबर सांगली, सातारा, कोल्हापूर, अहिल्यानगर, बीड यांसह पश्चिम महाराष्ट्रातील विविध जिल्ह्यांतूनही गंभीर रुग्ण ससूनमध्ये दाखल होत असल्याने ICU व्यवस्थेवरील ताण आणखी वाढत आहे.

रुग्णांची वाढती संख्या आणि ICU बेडची वाढती गरज लक्षात घेऊन ससून रुग्णालय प्रशासनाने मेडिकल ICUसाठी ४० आणि सर्जिकल ICUसाठी २० अशा एकूण ६० अतिरिक्त खाटा वाढविण्याचा प्रस्ताव शासनाकडे सादर केला आहे. मात्र, केवळ खाटा वाढविणे पुरेसे नसून त्यासाठी आवश्यक मनुष्यबळही उपलब्ध होणे गरजेचे आहे. त्यामुळे अतिरिक्त ICU बेडसाठी आवश्यक डॉक्टर आणि परिचारिका उपलब्ध करून देण्यासाठीही प्रयत्न सुरू असल्याचे अधिष्ठाता डॉ. एकनाथ पवार यांनी सांगितले.

दरम्यान, ICU बेडची आवश्यकता असलेल्या रुग्णांच्या नातेवाइकांनी रुग्णाला ससून रुग्णालयात आणण्यापूर्वी बेडची उपलब्धता तपासणे महत्त्वाचे आहे. त्यासाठी प्रत्यक्ष रुग्णालयात संपर्क साधण्याबरोबरच दूरध्वनीद्वारे पूर्वनोंदणी करून ICU बेडची स्थिती जाणून घेण्याचे आवाहन प्रशासनाने केले आहे. पूर्वनोंदणी न करता अचानक अत्यवस्थ रुग्णाला रुग्णालयात आणल्यास तातडीने ICU बेड मिळेलच असे नाही, त्यामुळे नातेवाइकांनी आधीच माहिती घेऊन पुढील उपचाराचे नियोजन करावे, असे प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

# एक कोटींच्या रोकड लुटीचा थरार; फरार पोलिस हवालदार जालन्यात जेरबंद!

**» पुणे | प्रतिनिधी**

**एक कोटी रुपयांची रोकड घेऊन जाणाऱ्या व्यावसायिकाला पोलिस असल्याचे सांगून अडवून रोकड लुटण्याचा प्रयत्न केल्याप्रकरणी फरार असलेल्या पोलिस हवालदाराला नऱ्हे पोलिसांनी जालना जिल्ह्यातील अंबड येथून अटक केली आहे. अजीज अब्बास इसुब मेस्त्री असे अटक करण्यात आलेल्या पोलिस हवालदाराचे नाव आहे. या प्रकरणातील महिला पोलिस हवालदार प्रमिला शरद निकम अद्याप फरार असून, तिने अटकपूर्व जामिनासाठी उच्च न्यायालयात धाव घेतली आहे.**



पुण्यातील नवले पूल परिसरात एका नामांकित व्यापाऱ्याला गाठून, स्वतः पोलीस अधिकारी असल्याचे भासवत तब्बल १ कोटी रुपयांची रोकड लुटल्याची अत्यंत धक्कादायक आणि खळबळजनक घटना उघडकीस आली आहे. या घटनेने संपूर्ण पुणे शहरात एकच खळबळ उडवून दिली असून, नऱ्हे पोलिसांनी या संपूर्ण हाय-प्रोफाइल लुटीच्या कटाचा पर्दाफाश केला आहे. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे, ज्या पोलिसांवर रक्षण करण्याची जबाबदारी आहे, त्याच पोलीस दलातील हवालदारांनी गुन्हेगारांशी हातमिळवणी करून हा दरोड्याचा कट रचल्याचे पोलीस तपासात स्पष्ट झाले आहे. याप्रकरणी नऱ्हे पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला असून, फरार झालेला पोलीस हवालदार अजीज अब्बास मेस्त्री याला पोलिसांनी जालन्यातून जेरबंद केले आहे, तर या कटात सहभागी असलेली महिला पोलीस हवालदार प्रमिला निकम सध्या फरार असून पोलीस तिच्या मागावर आहेत.

मिळालेल्या सविस्तर माहितीनुसार, व्यावसायिक हर्षवर्धन भूषण पवार यांनी १७ जुलै रोजी किरण आपटे नावाच्या व्यक्तीशी एका व्यवसायासंदर्भात सविस्तर चर्चा केली होती. या चर्चेदरम्यान ठरल्याप्रमाणे चव्हाण एंटरप्राइझेसच्या मालकाला १ कोटी रुपयांची रोकड देण्याचे निश्चित झाले होते. या व्यवहारानुसार, १८ जुलै रोजी व्यावसायिक हर्षवर्धन पवार हे आपल्या विश्वासातील कर्मचारी बाबू पवार यांना सोबत घेऊन १ कोटी रुपयांची रोकड एका बॅगेत भरून कारने निघाले. त्या कारमध्ये पवार यांच्यासोबत किरण आपटे आणि चव्हाण एंटरप्राइझेसचा प्रतिनिधी देखील उपस्थित होते. ही कार नऱ्हेच्या दिशेने पुढे जात असताना, नवले पुलाजवळ पोहोचताच अचानक दुचाकीवरून आलेल्या दोन अज्ञात व्यक्तींनी अतिशय फिल्मी शैलीत त्यांची कार अडवली.

गाडी थांबताच दुचाकीवरून आलेल्या भामट्यांनी 'आम्ही पोलीस आहोत, तुमच्या गाडीत काळा पैसा आहे आणि आम्हाला तुमची तपासणी करायची आहे,' असा दम भरत पवार यांच्याकडील रोकड हिसकावण्याचा प्रयत्न सुरू केला. गाडीत आणि बाहेर गोंधळाचे वातावरण निर्माण झालेले असतानाच, कारमध्ये पवार यांच्यासोबत बसलेल्या किरण आपटे याने याच संधीचा फायदा घेतला आणि तब्बल ७३ लाख ५० हजार रुपयांची रोकड भरलेली बॅग घेऊन तेथून थेट पळ काढला. हा प्रकार घडत असतानाच, दुचाकीवरून आलेल्या एका आरोपीने व्यावसायिक हर्षवर्धन पवार यांच्या डोळ्यांत अचानक तिखट फेकून त्यांना अंधाधुंद केले. त्यानंतर आरोपींनी पवार यांना जबरदस्तीने त्याच कारमध्ये डांबले आणि कार थेट शिवापूर पोलीस चौकीच्या दिशेने पळवली.

शिवापूर पोलीस चौकीच्या परिसरात पोहोचल्यानंतरही या टोळीची हिम्मत कमी झाली नव्हती. तेथेही आरोपींनी पवार यांना धाक दाखवून त्यांच्याकडे उरलेल्या २६ लाख रुपयांच्या रोकडीवर डल्ला मारण्याचा आणि ती रक्कम बळकावण्याचा पूर्ण प्रयत्न केला.

### बनावट पोलीस अजीज मेस्त्रीला ४ दिवसांची कोठडी!

दरम्यान, नऱ्हे पोलीस ठाण्याच्या तपास पथकाला गुप्त माहिती मिळाली की फरार मेस्त्री हा जालना जिल्ह्यातील अंबड परिसरात लपून बसला आहे. या माहितीच्या आधारे पोलिसांनी विलंब न लावता जालन्यात धाव घेऊन सापळा रचला आणि अजीज मेस्त्रीच्या मुसक्या आवळल्या. त्याला पुण्यात आणून रविवारी न्यायालयात हजर करण्यात आले असता, न्यायालयाने त्याची सखोल चौकशी करण्यासाठी त्याला चार दिवसांची पोलीस कोठडी सुनावली आहे.